.. Parashurama Arati ..

॥ परशुरामाची आरती ॥

जमदग्नीकुळभूषण मुक्ता फळदशना ।
अतिसज्जन मनमोहनरजनीकरवदना ।
अगणित महिमा तुझा न कळे सुरगणा ।
वदतो कंठी वाणी सरसीरुहनयना ॥ १ ॥

जय राम श्रीराम जय भार्गवरामा ।
नीरांजन करूं तुजला परिपूर्णकामा ॥ धृ ॥

सह्याद्रिगिरिशिखरीं शर घेऊनी येसी ।
सोडुनी शर पळवीसी पश्चिमजलधीसी ।
तुजसम रणधीर जगी न पडे दृष्टीसी ।
प्रताप थोर तुझा न कळे कवणासी ॥ जय ॥ २ ॥

तव कोप बहु पापी बा संहारी ।
दानव दहन करोनी वससी गिरिशिखरी ।
क्षत्रिय मारूनि अवनी केली निर्वैरी ।
सात्विक राजस तामस त्रिगुणां उद्धरी ॥ जय ॥ ३ ॥

दृढ भावे तव वंदन करिती जे चरणी ।
त्यांचे भवभय नाही जंववरि शशितरणी ।
शर मारुनी उद्भवली गंगा जनतरणी ।
चिंतामणि शरणागत निश्चल तव चरणी ॥ जय ॥ ४ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 24, 1999